# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Child in distressed situation**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **13/07/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे.मानोरा हद्दीतील एका गावातून शाळकरी अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याप्रकरणातील आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे.

## ‘त्या’ आरोपीला पोलिसांनी केली जेरबंद

### अल्पवयीन मुलीस पळविलेले प्रकरण

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ■ तालुक्यातील एका गावांतील शाळकरी अल्पवयीन मुलीस फूस लाऊन पळऊन नेल्याप्रकरणी दि.११ जुलै रोजी पीडितेच्या पालकांनी मानोरा पोलिसांत तक्रार दाखल केली.याप्रकरणी आरोपीला सायंकाळी जेरबंद करुन गुन्हयात अधिक वाढ करण्यात आली.

सूत्रांकडून प्राप्त माहिती नुसार तालुक्यातील एका गावांतील शाळकरी अल्पवयीन मुलगी शाळा बंद असल्याच्या कारणावरुन तिला तालुक्यातील पारवा यागावी नातेवाईकाकडे राहण्यास पाठविले. ९ जुलै रोजी सकाळी पीडितेच्या पालकांना दूरध्वनीवरुन संपर्क नातेवाईकाचा फोन आला असता सांगितले की तुमची मुलगी घरी आली का अशी विचारणा केली. परंतु माझी मुलगी घरी आली नसल्याकारणाने सर्व नातेवाईकाकडे दोन दिवस शोधाशोध केली असता मिळुन आली नाही. त्यामुळे ११ जुलै रोजी पीडितेच्या पालकांनी मानोरा पोलिसांत तक्रार दाखल केली. दरम्यान तळप येथील आकाश राजु धोंगडे हा नेहमी माझ्या मुलीच्या संपर्कात दिसत होता. त्यानेच माझ्या मुलीला पळऊन नेले. अशा आशयाच्या फिर्यादीवरुन मानोरा पोलिसांनी आरोपी आकाश राजु धोंगडे रा.तळप याचे विरूध्द कलम ३६३ भांदवी प्रमाणे गुन्हा दाखल करुन पोलीस उपनिरीक्षक सविता वड्डे, पोलीस जमादार गणेश जाधव, बालाजी महल्ले यांनी आरोपीचा तत्काळ शोध घेऊन अटक केली. आरोपी आकाश धोंगडे यांचे विरूध्द कलम ३६३,३६६अ, ३७६, ५०६ भांदवी सहकलम पॉस्को नुसार गुन्हा दाखल केला. सदर आरोपीस न्यायालया समोर हजर केले असता १४ दिवसीय न्यायालयीन कोठडी देण्यात आली. सदर प्रकरणाचा अधिक तपास ठाणेदार ब्रह्मदेव शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सविता वड्डे करीत आहे. (श.प्र.)

### आरोपीविरुध्द गुन्हा दाखल

११ जुलै रोजी पीडितेच्या पालकांनी मानोरा पोलिसांत तक्रार दाखल केली. दरम्यान तळप येथील आकाश राजु धोंगडे हा नेहमी माझ्या मुलीच्या संपर्कात दिसत होता. त्यानेच माझ्या मुलीला पळऊन नेले. अशा आशयाच्या फिर्यादीवरुन मानोरा पोलिसांनी आरोपी आकाश राजु धोंगडे रा.तळप याचे विरूध्द कलम ३६३ भांदवी प्रमाणे गुन्हा दाखल केला.